# ‘ग्रीनझोन ॲग्रोकेम’तर्फे ‘बसवंत हनी बी फेस्टिव्हल’चे आयोजन

## ‘मधुक्रांती-२०२१’ परिसंवादात मान्यवरांचा सहभाग






'ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि.' या कंपनीच्या माध्यमातून तसेच 'पूर्वा केमटेक प्रा.लि.' या कंपनीच्या सहकार्याने, पिंपळगाव बसवंत (मुखेड रोड, ता. निफाड, जि. नाशिक) येथे 'बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्रा'ची स्थापना जून २०१९ मध्ये करण्यात आली. देशातील या अभिनव प्रकल्पाने अल्पावधीतच अनेक कृषिउद्योगाधारित कार्यक्रमांचे आयोजन करून, केवळ राज्यातीलच नव्हे तर देशभरातील अनेकांची प्रशंसा मिळवली.



मधमाशी पालनासारख्या बव्हंशी दुर्लक्षित क्षेत्राच्या संदर्भात, एका खासगी कंपनीने कोणतीही सरकारी मदत किंवा सहकार्य न घेता; अशा प्रकारचा अभिनव प्रकल्प उभारून या विषयावरील प्रबोधन आणि तंत्रज्ञान प्रसाराचे कार्य सुरू केले, ही निश्चितच अभिनंदनीय बाब आहे. पहिल्याच वर्षी म्हणजे डिसेंबर २०१९ मध्ये मधमाशी पालनाविषयी 'मधुक्रांती-२०१९' हा राज्यस्तरीय परिसंवाद आयोजित करण्यात आला. यावेळी राज्यातील मधमाशी पालकांना तसेच या विषयातील तज्ञांना एकाच मंचावर आणण्याचा प्रयत्न उत्तम प्रकारे यशस्वी झाला. त्याचप्रमाणे या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना 'मधुक्रांती' पुरस्कार देऊन त्यांचा यथोचित सन्मानही करण्यात आला.

या प्रकारचे कार्यक्रम दरवर्षी घ्यावेत, अशी अपेक्षा या क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी व्यक्त केल्यामुळे, २०२० मध्येही अधिक व्यापक स्तरावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. परंतु कोविड संक्रमणाच्या पार्श्वभूमीवर प्रत्यक्ष कार्यक्रम आयोजित करता आला नाही. मात्र असे असले तरी 'मधुक्रांती २०२०' हा तीन दिवसांचा 'वेबिनार' (ऑनलाईन परिसंवाद) आयोजित करण्यात आला.



कोविडमुळे असलेल्या सामाजिक बंधनांच्या काळातही मधमाशी पालनाला प्रोत्साहन देण्यासाठी ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रम तसेच प्रबोधनाचे विविध उपक्रम या केंद्रातर्फे आयोजित करण्यात आले. या कालावधीत 'बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्रा'चा मोठ्या प्रमाणावर कायापालट करण्यात आला. या केंद्रामध्ये आधुनिक स्वरुपात आणि निसर्गसमृद्ध वातावरणात मधमाशीचे अतिशय उपयुक्त असे कार्य समजावून देण्यासाठी अनेकविध स्वरुपाची सचित्र माहिती आणि प्रकल्पांची मांडणी करण्यात आली आहे. हा उपक्रम आता सर्वांसाठी खुला झाल्यामुळे; तसेच दरवर्षी डिसेंबरमध्ये मधमाशी पालनविषयक 'जागृतीचा उत्सव' साजरा करण्याची परंपरा कायम ठेवण्याच्या उद्देशाने, यावर्षी देखील **'हनी बी फेस्टिव्हल-२०२१'** या कार्यक्रमाचे आयोजन **दि. २१ ते २६ डिसेंबर** या कालावधीत करण्यात आले आहे. मधमाशीच्या लोकोपयोगी कार्यशैलीची सविस्तर माहिती देऊन, तिच्या माध्यमातून सजीव सृष्टीचे कल्याण कसे करता येऊ शकते, हे सांगण्याचा प्रमुख उद्देश या उपक्रमामागे आहे.

तसेच **दि. २२ व २३ डिसेंबर** या कालावधीतच **'मधुक्रांती २०२१'** या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये मधमाशी पालनाची सद्य:स्थिती आणि

भविष्यातील वाव, रोजगार निर्मिती, परागीभवनातून शेती उत्पादनात वाढ, शासकीय अनुदान, योजना, अर्थसाहाय्य, मधमाशीपालनातून मिळणाऱ्या विविध पदार्थांची निर्मिती आणि त्यांचा मानवी आरोग्यासाठी फायदा अशा विविध विषयांवर या क्षेत्रातील नामवंत मार्गदर्शन करणार आहेत.

'हनी बी फेस्टिव्हल'मध्ये मधमाशीबद्दलची सविस्तर माहिती देण्यासाठी विविध स्टॉल्सची उभारणी करण्यात आलेली आहे. मधमाशी पालनासाठी लागणारे विविध साहित्य, मध उत्पादन आणि मध काढण्याचे प्रात्यक्षिक, मधमाशी पालनातून मिळणाऱ्या विविध पदार्थांची ओळख, मधमाशी पालन अंगिकारणारे आदर्श गाव आणि त्याचे अर्थकारण, मधमाश्यांच्या विविध जाती तसेच मधमाश्यांना आवडणाऱ्या विविध फुलझाडांची नर्सरी, पॉटरी पेंटिंग, बांबू- स्टोन पेंटिंगसह नेहमीचे पेपर पेंटिंग अशा अनोख्या संकल्पना आहेत. मधमाशी पालनावर आधारित मार्गदर्शक चित्रफीत आणि वैशिष्ट्यपूर्ण अशी बी मूव्ही (डॉक्युमेंटरी) बघण्याचा आनंद या फेस्टिव्हलमध्ये घेता येणार आहे. प्रचलित लोकधारणेतील मधमाशी 'चावणारी' म्हणून सामोरी न येता, 'जीवनाला आधार देणारी' आणि मानवासह इतर सजीवांना दोन वेळेचे अन्न खायला मिळेल याची तरतूद करणारी मधमाशी येथे



अधोरेखित होते. एवढेच नव्हे तर रोजगाराची संधी देणारी, गाव आर्थिकदृष्ट्या समृद्ध करणारी आणि मानवी आरोग्य संपन्न करणारी अशा अनेक अंगांनी मधमाशीचे महत्त्व येथे जाणून घेता येईल. लहान मुलांपासून ते वयोवृद्धांपर्यंत तसेच बेरोजगार युवक-युवती, शहरी-ग्रामीण समाज यांना मधमाशीचे अपार योगदान समजावून सांगणारा;



त्याचप्रमाणे भविष्यात तिला जगवून तिच्या माध्यमातून आपली प्रगती करण्याचा संदेश देणारा हा उपक्रम निश्चितच आगळा वेगळा आहे.

आजपर्यंत आपण अनेक प्रदर्शने बघितली असतील परंतु त्यामध्ये तोचतोचपणा जाणवत असतो. आपण आजपर्यंत अनेक फेस्टिव्हल्सला भेटी दिल्या असतील परंतु काही फेस्टिव्हल्स केवळ करमणूक करतात तर काही फक्त तांत्रिक ज्ञान देतात. काही फेस्टिव्हल्समध्ये नाविन्य नसते. परंतु 'हनी बी फेस्टिव्हल' म्हणजे पूर्णपणे नवीन संकल्पना, नवीन तंत्रज्ञान, नवीन करमणूक, नवीन प्रबोधन आणि नवीन उपक्रम म्हटला पाहिजे. येथे आल्यानंतर वेळ कसा जाईल, हे कळणार देखील नाही!

'बसवंत हनी बी फेस्टिव्हल'सारखी संकल्पना राबवून, त्यातून असा कार्यक्रम घेण्याचा हा देशातील पहिलाच जणु शुभारंभाचा प्रयोग आहे! या अभिनव उपक्रमामध्ये सहभागी होऊन आपण त्याचे सुजाण साक्षीदार व्हाल, अशी अपेक्षा आहे. मधमाशीला एकदा समजावून घ्या, तिची कार्यपद्धती बघा, तिची विविध उत्पादने बघा, ती शेतीचे उत्पादन कसे वाढविते ते बघा, ती रोजगार निर्मिती कशी करते ते बघा आणि पुढील तीस वर्षांमध्ये कशा प्रकारे मधमाशी अखिल मानवजातीची कशी 'चांगली मैत्रीण' होणार आहे तेही बघा! अर्थात त्यासाठी **'बसवंत हनी बी फेस्टिव्हल'ला भेट द्यावी लागेल. म्हणूनच दि. २१ ते २६ डिसेंबर २०२१ या दरम्यान बसवंत मधमाशी उद्यान, मुखेड रोड, पिंपळगाव बसवंत, ता. निफाड, जि. नाशिक येथे नक्की भेट देण्याचे नियोजन आपण जरुर करा!**

**(सौजन्य : पूर्वा कृषिदूत परिवार)**

# मधमाशी पालनामुळे शेतं होतील हिरवीगार; गावोगावी युवकांना मिळू लागेल रोजगार!



# 'बसवंत मधुक्रांती २०२१'

## दुसऱ्या हरितक्रांतीसाठी मधुक्रांती

## मधमाशी पालनातून शाश्वत विकास

## राज्यस्तरीय परिसंवाद

## २२ – २३ डिसेंबर २०२१

(वेळ : सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.००)

### २२ डिसेंबर २०२१

**सकाळी** ९.३० ते १०.०० : नोंदणी

१०.०० ते ११.०० : उद्घाटन आणि पुरस्कार वितरण

११.०० ते १२.३० : **तांत्रिक सत्र पहिले :** चेअरमन – **डॉ. बी.बी. पवार**

माजी कुलसचिव, म. फुले कृषी विद्यापीठ, राहुरी

* मधमाशी पालनाची सद्य:स्थिती आणि भविष्यातील संधी

**डॉ. बिपीन जगताप**

उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, मुंबई

* मधमाशी पालकांसाठी अर्थसाहाय्य आणि अनुदानाच्या योजना

**डॉ. डी.आर. पाटील**

संचालक, महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, महाबळेश्वर

* जागतिक पातळीवरील मधमाशी पालन

**डॉ. तुकाराम निकम**

विषयतज्ञ, सुप्रकृती मधुशाळा, नाशिक

* मुक्त चर्चा आणि शंका समाधान

**दुपारी** १२.३० ते १२.४५ : चहापान

१२.४५ ते २.०० : **तांत्रिक सत्र दुसरे :** चेअरमन – **डॉ. तुकाराम निकम**

विषयतज्ञ, सुप्रकृती मधुशाळा, नाशिक

* आग्या मोहोळांचे संरक्षण आणि त्याद्वारे परागीभवन

**श्री. विजय महाजन**

शिवसागर मध उद्योग, तळेगाव दाभाडे, पुणे

* परागीभवनामध्ये मधमाश्यांचे महत्त्व

**प्रा.श्री. उत्तम सहाणे**

विषयतज्ञ, केव्हीके, कोसबाड हिल, पालघर

* मधमाशीच्या गावाद्वारे ग्रामसमृद्धीकडे

**श्री. संजय पवार**

कार्यकारी संचालक, ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि., नाशिक

* मुक्त चर्चा आणि शंका समाधान

**दुपारी** २.०० ते ३.०० : भोजन

३.०० ते ४.०० : **तांत्रिक सत्र तिसरे :** चेअरमन – **डॉ. बिपीन जगताप**
उपमुख्य कार्यकारी अधिकारी, खादी ग्रामोद्योग मंडळ, मुंबई
* बसवंत मधुक्रांती पुरस्कारार्थींचे मनोगत आणि मुक्त चर्चा

४.००ते ५.०० * मधमाशीच्या विविध जातींची पाहणी, मधपेटी व्यवस्थापन
आणि मध काढण्याचे प्रात्यक्षिक
**श्री. नितीन कराळे, श्री. सचिन उगले, श्री. शुभम वाघ आणि श्री. गौरव पवार**
बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्रातील व्यवस्थापकीय सहकारी

## २३ डिसेंबर २०२१

**सकाळी** १०.०० ते १२.०० : **तांत्रिक सत्र चौथे :** चेअरमन – **डॉ. सूर्या गुंजाळ**
मा. संचालक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
* मधमाशीपालनातून परागकण आणि रॉयल जेलीचे उत्पादन तंत्र

**डॉ. लक्ष्मी राव**
मा. सहायक संचालक, केंद्रीय मधमाशी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे
* मधमाशी पालनातून विविध पदार्थांची निर्मिती आणि उपयुक्तता

**डॉ. धनंजय वाखले**
मा. विकास अधिकारी, केंद्रीय मधमाशी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे
* मधमाशीच्या प्रचार– प्रसारात केंद्रीय मधमाशी संशोधन
आणि प्रशिक्षण संस्थेचे योगदान

**डॉ. एस.एम. पोकरे**
सहाय्यक संचालक, केंद्रीय मधमाशी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे
* मुक्त चर्चा आणि शंका समाधान

१२.०० ते १२.१५ : चहापान

**दुपारी** १२.१५ ते १.३० : **तांत्रिक सत्र पाचवे** : चेअरमन – **डॉ. बी.एस. शेवाळे**
मा. प्राध्यापक, म. फुले कृषी विद्यापीठ, राहुरी
* मधमाशीपासून मिळणाऱ्या पदार्थांची मानवी आरोग्यासाठी उपयुक्तता

**डॉ. अविनाश पवार**
स्त्रीरोगतज्ञ, नाशिक
* मधमाशी पालनातून रोजगार निर्मिती

**डॉ. भास्कर गायकवाड**
टेक्निकल डायरेक्टर, ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि., नाशिक
* मुक्त चर्चा आणि शंका समाधान

१.३० ते २.०० : समारोप कार्यक्रम
* सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन

**श्री. संदीप वाघ**
प्रकल्प संचालक, बसवंत कृषी उद्योग पर्यटन केंद्र

२.०० ते ३.०० : भोजन

३.०० ते ५.०० : **हनी बी फेस्टिव्हलला भेट**